महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ६८ वे | दिनांक : २८/०२/२०२६ | वार : शुनिवार

## रोहित पवारांना पक्षाचा कब्जा हवाय : मंत्री अनिल पाटलांचा आरोप



**मुंबई :** दिवंगत नेते व राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूनंतर, हा अपघात आहे की घातपात अशी शंका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी सातत्याने पत्रकार परिषद घेत प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच व्हीएसआर कंपनीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी त्यांनी ठिय्या केला. मात्र, पोलिसांनी गुन्हा दाखल न केल्याने आज त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली. यावरून आता राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या आमदारांनी रोहित पवारांवर टीका केली आहे.

हे नाटक करायची गरज नाही, असे म्हणत आमदार सुनील शेळके यांनी टीका केली आहे. तर, रोहित पवारांना पक्षाचा कब्जा हवा आहे, त्यासाठी ते आमच्या नेत्यांवर खापर फोडत आहेत, असा पलटवार मंत्री व आमदार अनिल पाटील यांनी केला आहे.

आमदार अनिल पाटील म्हणाले, अजित दादांवर जर तुमचे खरेच प्रेम असेल तर नाटक करायची काही गरज नाही. रोहित पवार यांच्यासोबत जाण्याचा प्रश्नच येत नाही. रोहित पवार काही एजन्सी नाहीत, त्यांच्याकडे जर काही पुरावे असतील तर त्यांनी तपास यंत्रणांकडे द्यावेत, असे पाटील म्हणाले. तसेच, जर त्यांना सुनेत्रा पवार यांच्याबद्दल एवढेच वाटत आहे तर जेव्हा त्या राष्ट्रीय अध्यक्ष होत आहेत, तेव्हा त्यांना सोडून जायला नको होते.

पुढे बोलताना अनिल पाटील म्हणाले, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार पत्रकारांना थोड्या दिवसात बोलतील. अमोल मिटकरी असेल किंवा आम्ही सगळे आमदार असू, आमचे एकच म्हणणे आहे की सगळ्या घटनेचा तपास झाला पाहिजे, सत्य बाहेर आले पाहिजे आणि यंत्रणा ते काम करतील, असेही अनिल पाटील यांनी म्हटले.

रोहित पवारांना पक्षाचा कब्जा हवा आहे, त्यासाठी ते आमच्या नेत्यांवर खापर फोडत आहेत, असा आरोपही अनिल पाटील यांनी केला आहे. राज ठाकरे असतील किंवा रोहित पवार असतील ते काहीही बोलू द्यात, यंत्रणा योग्य तपास करतील, असेही पाटील म्हणाले.

तर दुसरीकडे आमदार सुनील शेळके यांनी देखील रोहित पवारांवर टीका केली आहे. ते म्हणाले, रोहित पवार हे दररोज नव-नवीन पुरावे समोर आणत आहेत, मग ते वरिष्ठ नेते पवार साहेब, सुनेत्राताई पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत बसून त्यांच्यासमोर का मांडत नाहीत? दादांच्या बाबतीत कोणीही राजकारण करत नाही. मुळात आमच्या पक्षात काय चालले आहे याकडे पाहण्यापेक्षा आपल्या पक्षात काय चालले आहे हे पहावे, असे शेळके यांनी म्हटले.

पुढे बोलताना सुनील शेळके म्हणाले, पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदी सुनेत्राताईंची निवड करून योग्य तो मानसन्मान आम्ही ठेवलेला आहे. झिरवाळांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात उत्तर दिले आहे. रोहित पवार जे आरोप करत आहेत, त्यात तथ्य नाही, असेही शेळके यांनी म्हटले.

जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

## लाडकी बहीण योजनेमुळे इतर खात्यांवर ताण? सभागृहात गणेश नाईकांचे विधान चर्चेत



**मुंबई :** विधानपरिषदेत काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर उत्तर देताना वनमंत्री गणेश नाईक यांनी केलेले वक्तव्य सध्या चर्चेचा विषय ठरले आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा उल्लेख करताना नाईक यांनी सांगितले की, राज्य शासनाने गेल्या वर्षभरात अनेक प्रकल्प सुरू केले असून त्यामध्ये या योजनेलाही मान्यता देण्यात आली आहे. मात्र या योजनेमुळे इतर खात्यांवर ताण निर्माण होण्याची परिस्थिती तयार होत असली तरी ती योजना बंद होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या वक्तव्यामुळे सभागृहात चर्चा रंगली.

सतेज पाटील यांनी धनगरवाडे आणि आदिवासी पाड्यांच्या प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले. कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूवाडी, राधानगरी, गगनबावडा या भागांत अनेक धनगरवाडे जंगल परिसरात असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री गावांना जोडण्यासाठी सिमेंट काँक्रिटचे रस्ते करण्याबाबत बोलत आहेत, तर धनगरवाडे जोडण्यासाठी विशेष मोहीम राबवता येईल का, असा प्रश्न त्यांनी विचारला. नुकतीच तीन किलोमीटर अंतरावरून एका रुग्णाला खांद्यावरून नेण्याची वेळ आल्याची बातमी त्यांनी सभागृहात मांडली. अशा परिस्थितीत वन विभागाने पुढाकार घेऊन काही उपाययोजना कराव्यात का, असा थेट सवाल त्यांनी केला.

यावर उत्तर देताना गणेश नाईक यांनी वनविकास महामंडळ स्थापनेपासून करण्यात आलेल्या साग लागवडीचा उल्लेख केला. कापणीसाठी उपलब्ध असलेली सागाची संपत्ती सुमारे बारा हजार कोटी रुपयांची असल्याचे त्यांनी सांगितले. या संपत्तीच्या आधारे एखाद्या बँकेकडून सुमारे सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव अधिकाऱ्यांना दिल्याचे त्यांनी सांगितले. जंगल व्यवस्थापनात झाडांची विरळणी करताना मिळणाऱ्या लाकडातून कर्जावरील व्याज फेडता येऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले. या निधीमुळे वन खात्याच्या अनेक प्रलंबित प्रश्नांना दिलासा मिळेल, असा त्यांचा दावा होता.

नाईक पुढे म्हणाले की, वन खात्याला सहा हजार कोटी उपलब्ध झाल्यास हिरवे डोंगर, सप्त रंगांचे डोंगर आणि सुगंधी रस्ते यांसारख्या संकल्पना राबवता येतील. तसेच वन कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबतचे प्रश्नही सोडवता येतील. ठोक पगाराऐवजी मूळ वेतन, महागाई भत्ता आणि इतर भत्ते देण्याचा विचार करता येईल. क्षेत्रीय वनाधिकारी आणि विभागीय वनाधिकारी कार्यालये, पर्यटन विकास तसेच इतर पायाभूत सुविधा उभारण्यासाठी हा निधी वापरता येईल. हा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळासमोर मांडला जाईल, असे त्यांनी सांगितले.

वनक्षेत्रातील वाड्या-वस्त्यांच्या स्थलांतरासाठीही या निधीचा वापर होऊ शकतो, असे नाईक यांनी नमूद केले. भविष्यात वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. विशेषतः व्याघ्र प्रकल्प परिसरातून मानवी वस्त्या दूर केल्यास संघर्ष कमी होईल, असा त्यांचा विश्वास आहे. मात्र या स्थलांतरासोबत पर्यायी शेती किंवा उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्याबाबतही विचार करावा लागेल, असे त्यांनी सांगितले. धनगरवाड्यांच्या रस्त्यांसाठी निश्चित प्रयत्न केले जातील, असे आश्वासन देत त्यांनी चर्चेचा समारोप केला.

## अजित पवारांच्या विमान अपघातामागे काळेबेरे? राज ठाकरेंचा सरकारवर संशयाचे भूत नाचवण्याचा आरोप



**मुंबई :** अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी सरकार FIR दाखल करून घेण्यास घाबरत आहे. त्यामुळे त्यामागे काहीतरी काळेबेरे आहे असा संशय निर्माण होतोय, असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केले. अजित पवारांच्या अपघाताविषयी FIR का नोंदवला जात नाही? या प्रकरणी सरकार का अडथळे आणत आहे? सरकार एका FIR ला का घाबरत आहे? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती राज ठाकरे यांनी या प्रकरणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना राज ठाकरे यांनी सरकारवर उपरोक्त प्रश्नांच्या फैरी झाडल्या. ते म्हणाले, रोहित पवार यांनी आज माझी भेट घेतली. त्यांनी मला अजित पवार यांच्या विमान अपघाताविषयी सर्व तांत्रिक गोष्टी सांगितल्या. मला त्यांच्या सगळ्या बोलण्यातून एक गोष्ट जाणवली. त्यांनी ३ ठिकाणी एफआयआर दाखल करण्याचा प्रयत्न केला. पण तिन्ही ठिकाणी सरकारच्या दबावामुळे एफआयआर नोंदवणून घेण्यात आला नाही. त्यामुळे मला इथेच संशयाची सुई वाटते.

पोलिसांनी एफआयआर नोंदवून घेऊ नये असे सरकारला का वाटत आहे? मरीन ड्राईव्ह पोलिस स्टेशन येथील अधिकारी एफआयआर लिहून घेत होते. पण तो टाईप करत असतानाच डीसीपी आले. त्यांनी एफआयआर लिहू नका असे सांगितले. हे कशासाठी? हा निव्वळ अपघात असेल, तो घातपात नसेल किंवा त्यांच्या कुटुंबीयांना याविषयी काही संशय असेल आणि तपास नीट व्हावा अशी त्यांची इच्छा असेल तर या प्रकरणी एफआयआर दाखल झाला पाहिजे. पण त्यात सरकारकडून अडथळे का आणले जात आहेत? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

अजित पवारांच्या विमान अपघाताविषयी अद्याप FIR का नोंदवला जात नाही? एफआयआर नोंदवण्यासाठी तीन-तीन ठिकाणी प्रयत्न करूनही सरकार त्यात आडकाठी का आणत आहे याचे उत्तर मिळाले पाहिजे. पोलिस अधिकाऱ्यांवर दबाव का आणला जात आहे? सरकारच्या दबावामुळे एफआयआर नोंदवला जात नसेल, तर निश्चितच यामागे काहीतरी काळेबेरे आहे. सरकार एका एफआयआरला का घाबरत आहे? असे विविध प्रश्नही राज ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केले.

राज ठाकरे यांनी यावेळी अजित पवार यांच्या पत्नी तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना या सर्व गोष्टींवर विचार करण्याचाही सल्ला दिला. ते म्हणाले, सुनेत्रा पवार सध्या उपमुख्यमंत्री म्हणून तिथे बसल्या आहेत. त्यांनी या सर्व गोष्टींचा विचा केला पाहिजे. त्यांच्या पतीच्या अपघाताविषयी हा एफआयआर आहे. सरकारकडून हा एफआयआर दाखल न करण्यासाठी दबाव टाकला जात आहे. हे राजकारण नक्की काय हे कळत नाही. पण एफआयआर दाखल करताना अडथळे आणले जात असतील, तर यामागे काही काळेबेरे आहे का असा संशय निर्माण होतो. हा संशय सरकारचा निर्माण करत आहे.

राज ठाकरे यांनी यावेळी रोहित पवार यांच्या मागणीत काहीही गैर नसल्याचेही ठणकावून सांगितले. रोहित पवार यांनी या प्रकरणी एफआयआर दाखल व्हावा, चौकशी व्हावी अशी मागणी केली असेल तर त्यात गैर काय? सरकारने या गोष्टींकडे गांभिर्याने पाहिले पाहिजे. तसेच या प्रकरणी स्पष्टीकरणही दिले पाहिजे, असे ते म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६


## उर्दूच्या अंगणात उमलली मराठीची फुले; बोरनारमध्ये 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात



**बोरनार (प्रतिनिधी)** येथील इकरा शिक्षण संस्था, जळगाव संचलित अब्दुल मजीद सालार इकरा उर्दू हायस्कूलमध्ये 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात इयत्ता पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक श्री.आरीफ खान होते.आपल्या मार्गदर्शनात त्यांनी २७ फेब्रुवारी या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व विशद केले. "मराठी भाषा ही केवळ एक भाषा नसून ती आपली संस्कृती आणि अस्मितेची ओळख आहे. उर्दू माध्यमाच्या विद्यार्थ्यांनीही मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेणे हे कौतुकास्पद आहे," असे त्यांनी नमूद केले.यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा गौरव करणारी भाषणे दिली. कुसुमाग्रजांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकून त्यांच्या अजरामर कवितांचे सादरीकरण करण्यात आले. विशेषत, विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विनोदी चुटकुल्यांनी कार्यक्रमात रंगत आणली, ज्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख श्री.फिरोज खान सर यांनी केले. अध्यक्षीय निवडीचा प्रस्ताव श्री. शेख सादिक सर यांनी मांडला, तर त्याला श्री. शेख अमीर सर यांनी अनुमोदन दिले. कार्यक्रमाच्या सांगतप्रसंगी श्री. शेख जव्वाद सर यांनी सर्वांचे आभार मानले.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. मजहर खान, श्री. शेख रोशन, श्री. आबिद पिंजारी, तसेच लिपिक श्री. आकिब, मुस्ताक भाई, युसुफ भाई आणि शब्बीर भाई यांनी विशेष परिश्रम घेतले. या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. अब्दुल करीम सालार साहेब व इतर सभासदांनी मुख्याध्यापक व शिक्षक वृंदाचे विशेष अभिनंदन केले आहे.

## राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महिला मेळावा व आरोग्य शिबिर संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे व्हंताळ येथे महिला मेळावा व मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन गुरुवार दिनांक २६ फेब्रुवारी रोजी करण्यात आले. कार्यक्रमास गावातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती जयश्रीताई सगर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब पाटील, डॉ बनसोडे सर, डॉ. कुलकर्णी सर, श्रीमती डॉ. कोकाटे मॅडम तसेच मिलिंद पाटील उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.महिला मेळाव्यात डॉ पार्वती सावंत यांनी महिलांचे आरोग्य, पोषण, रक्ताल्पता, स्वच्छता, माता-बाल संगोपन, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती दिली. उपस्थित तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांच्या आरोग्य समस्यांवर मार्गदर्शन करत नियमित तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले.आरोग्य शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबिन आदी तपासण्या मोफत करण्यात आल्या. गरजू महिलांना औषधांचे वाटप करण्यात आले. शिबिरात मोठ्या संख्येने महिलांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. भारत शेळके, डॉ अनिल देशमुख, डॉ रंजना चोचंडे, प्रा ज्योती जोगदाबगे, महिला प्राध्यापक, ग्रामस्त महिला, शिबिरार्थी विद्यार्थिनी, स्वानसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रेम चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिबिरार्थी विद्यार्थिनी अमृता मुगळे हिने सर्व उपस्थितांचे आभार मानले.या उपक्रमामुळे महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून भविष्यातही असे समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

## जय भवानी महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा



**पाटोदा, (प्रतिनिधी) :** जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या येथील कला आणि विज्ञान महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयाच्या मराठी विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून गढीच्या श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम हे उपस्थित होते. मराठी भाषेतील महान कवी दिवंगत कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या औचित्याने सर्वत्र मराठी भाषा गौरवदिन साजरा केला जातो. या अनुषंगाने कार्यक्रमाच्या प्रारंभी कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्ताने मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखित 'अक्षरवेल' या भित्तीपत्रकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते झाले. हे भित्तीपत्रक 'कवी कुसुमाग्रज विशेषांक' या स्वरूपात तयार करण्यात आले आहे. याप्रसंगी मान्यवरांची यथोचित भाषणे झाली असून मराठी भाषा संवर्धनाची जबाबदारी सर्वच समाजाची असल्याचा सूर याप्रसंगी व्यक्त झाला. प्राचार्य डॉ. विश्वास कदम आणि प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठी विभागाचे प्रा. बापू घोक्षे, डॉ. रामकृष्ण प्रधान, कनिष्ठ मराठी विभागाचे प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांच्यासह डॉ. बंडू लोखंडे, प्रा. पापाजी चव्हाण, श्री. कुणाल काळे, श्री. दत्ता चादर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास प्रतिष्ठित नागरिक, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology


Contact: 9405109103 8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६

# जीवसृष्टी न जपल्यास हव्यासामुळे जागतिक जैवविविधतेचे प्रचंड नुकसान - डॉ राजेंद्र दाते पाटील




"कथा जैवविविधतेची (प्रवास जीव सृष्टीचा)" प्रतिथयश लेखक डॉ संजय जोशी यांचा अभ्यास समजून घेताना त्यांनी एक "अर्पणपत्रिका" तयार केली त्यात त्यांचे सामाजीक भाव प्रतिबंधित होतांना एक नाजूक व "प्रेमळ बांधभाव" दृष्टीस पडतो ज्यात त्यांनी अधोरेखीत केले की " ज्यांनी मला हातात लेखणी धरायला शिकवलं ते त्यांचे बाबा कै.दिगंबर विनायक जोशी आणि ज्यांच्यामुळे त्यांच्या आयुष्यात ' "कल्पना" आली त्या त्यांच्या "सासूआई" कै.शकुंतला गजानन पळशीकर यांच्या आनंददायी स्मृतीला आणि जिच्या लेखनकलेचे काही "जीन्स" त्यांच्यात उतरले आहेत त्या त्यांच्या "आई" श्रीमती मंदाकिनी दिगंबर जोशी यांना सादर अर्पण !" हा भावबंध बोलका ठरला असुन डॉ.संजय जोशी हे निसर्ग अभ्यासातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व आहेत, ज्यांचे पर्यावरण संरक्षण आणि जैवविविधता क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे.शैक्षणिक व अध्यापन कारकीर्द पुणे विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागातील 1981 च्या बॅचचे माजी विद्यार्थी म्हणून त्यांनी ठाणे येथील बी.एन.बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात 29 वर्षे जीवशास्त्राचे अध्यापन केले.नंतर के.सोमय्या महाविद्यालयात पर्यावरण विज्ञान पदवी उत्तर विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून निवृत्ती घेतली.संस्थात्मक योगदान "पर्यावरण दक्षता मंडळ, ठाणे" या स्वयंसेवी संस्थेचे ते उपाध्यक्ष आहेत. या संस्थेमार्फत पर्यावरण जागरूकता व संवर्धन कार्यात सक्रिय सहभाग घेतला असून, ' हॅलो सह्याद्री' सारख्या कार्यक्रमां मध्ये पर्यावरण- मानव बंधन व मानवी जीवनावर व्याख्याने दिली.लेखन व प्रकाशन 'कथा जैवविविधतेची (प्रवास जीवसृष्टीचा)' हे त्यांचे मैलाचा दगड ठरलेले पुस्तक जैवविविधतेच्या उत्पत्ती पासून संकटां पर्यंतचे सखोल विश्लेषण सादर करते. "निसर्ग व पर्यावरण विषयावर शेकडो लेख " विविध मासिके व वृत्तपत्रां मध्ये प्रकाशित झाले असून, 2025 मध्ये त्यांना "छत्रपती शिवाजी महाराज साहित्य पुरस्कार मिळाला."त्यांच्या पुस्तकातील अभ्यासु बाजू आपण समजून घेणार आहोत. डॉ. संजय जोशी लिखित एकूण दहा प्रकरणे असलेल्या या पुस्तकात पहिल्या दोन प्रकरणांमधे डाॅ. जोशी यांनी 4.5 अब्ज वर्षांपूर्वी जेंव्हा पृथ्वीचा जन्म झाला त्यावेळेस असलेलं वातावरण, त्यानंतर शंभर कोटी वर्षांनी पहिला जीव अस्तित्वात आला याबद्दल च्या घडामोडींचं सविस्तर वर्णन केलेले असुन पुढेडॉ संजय जोशी यांनी पुढे लिखानात नमुद केले की, जीवसृष्टीची भरभराट होत गेली व शरीरातील पेशी, डीएनए-आरएनएचे रेणू यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात जैववैविविधता कशी निर्माण झाली याचं शास्त्रीय विवेचन पुढील प्रकरणां मध्ये वाचायला मिळते. पुढे पृथ्वीवरील विविध नैसर्गिकअधिवासां मध्ये जीवसृष्टी कशी विस्तारलेली आहे याचं वर्णन येतं. नंतरच्या प्रकरणात जैवविविधता ही एक प्रकारची जागतिक सहकारी बँक असून मानवाला मिळत असलेल्या जीवनावश्यक सेवा यांचं वर्णन वाचायला मिळतं. पुढच्या प्रकरणात आपल्या हव्यासामुळे आपण जैवविविधतेची कशी प्रचंड प्रमाणात हानी करीत आहात याचे अंगावर शहारे येतील असं त्यांनी वर्णन केलं आहे. शेवटच्या प्रकरणात जैवविविधता संरक्षण आणि संवर्धनासाठी जगभरात आणि विशेषतः भारतात सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती या संदर्भातील भारत सरकारने केलेले कायदे, आंतरराष्ट्रीय मोहिमा, संशोधन, आणि काही निवडक यशोगाथा यांची ऊत्कृष्ट मांडणी केलेली आढळते. शेवटच्या पानावर छत्रपती शिवाजी महाराजांचं आज्ञापत्र दिलं आहे.या सर्व प्रकरणांतील वर्णन आणि माहिती अतिशय रंजक आणि सर्व सामान्यांना नेमके कळेल अशा साध्या- सोप्या शब्दांत दिली आहे. ठिकठिकाणी प्राणी किंवाजीवसृष्टीतील सजीव आपल्याशी संवाद साधून त्यांची माहिती देत आहेत, त्यांची कैफियत मांडत आहेत अशी कल्पना असलेले चित्र त्यांनी अंत्यन्त खुबीने केली आहे. एकूणच शास्त्रीय माहिती किचकट न वाटता अतिशय ओघवत्या आणि सर्वसामान्यांना सहज समजेल अशा पद्धतीने दिली आहे. या पुस्तकातील डॉ संजय जोशी यांनी एक विशेष दृष्टी असलेल्या या लेखकाने प्रत्येक प्रकरणाची सुरूवात त्या प्रकरणाचे सार वर्णन करणाऱ्या स्वरचित कवितेने केली आहे हे या पुस्तकाचं खास आणि अत्यंत महत्वाचे वैशिष्ट्य आहे. शिवाय पशु-पक्षी, प्राणी वनस्पती यांची भरपूर रंगीत,आकर्षक छायाचित्रे या पुस्तकात आहेत. या पुस्तकाला आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले असुन त्यात ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालयाचा विज्ञान विभागातील अत्यंत प्रतिष्ठेचा श्रीस्थानक राज्यस्तरीय पुरस्कार प्रसिद्ध कवयित्री आणि लेखिका नीरजा यांच्या हस्ते देण्यात आला तसेच मुंबई सेंट्रल येथील मराठा मंदिर संस्थेतर्फे देण्यात येणारा विज्ञान साहित्य पुरस्कार ख्यात नाम शास्त्रज्ञ आणि विज्ञान कथा लेखक डाॅ. बाळ फोंडके यांच्या हस्ते देण्यात आलेला असुनअहिल्यानगर येथील अहमदनगर जिल्हा विद्या प्रसारक समाज आणि श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडार यांच्यावतीने छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार विख्यात नाट्यकर्मी प्रेमानंदजी गज्वी यांच्या हस्ते देण्यात आलेला आहे तर ठाण्या तील सृजनसंवाद प्रकाशनाचे गीतेश शिंदे यांनी या पुस्तकाची उच्च दर्जाची अतिशय उत्तम निर्मिती केली आहे.दोनशे अडतीस पृष्ठसंख्या असलेल्या या पुस्तकाची किंमत पाचशे असून शाळांमधील ग्रंथालयांना सवलतीच्या दराने उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस असुन सदरचे पुस्तक घरपोच सुद्धा प्राप्त करता येणार असुन सदरचे पुस्तक घर पाहोच मागवण्यासाठी तथा प्राप्त करण्यासाठी वाचकानी प्रकाशक गीतेश शिंदे यांचे 9820272646 संपर्क साधावा. लेखक डॉ. संजय जोशी यांचे शी8879169187 या नंबरवर संपर्क साधता येऊ शकतो.या अभ्यासु पुस्तका चा लाभ शालेय विद्यार्थी व तरुण वर्गाने आवश्यक घ्यावा असे आवाहन ही करण्यात येत आहे.



**विश्लेषक-डॉ राजेंद्र दाते पाटील**
जेष्ठ जलतज्ञ व पर्यावरण विषयक अभ्यासक छत्रपती संभाजीनगर

# डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय येथे ‘ट्रॅव्हल अँड टुरिझम’ शॉर्ट टर्म कोर्स उद्‌घाटन उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालय येथे इतिहास विभाग आणि विवेकानंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सामंजस्य करार (MOU) अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या 396 व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याच प्रसंगी ‘ट्रॅव्हल अँड टुरिझम’ या शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सचे उद्‌घाटनही करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या मा. डॉ. सुनिता बाजपाई होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. कैलास धोंडीबाराव भरकड (इतिहास विभाग, विवेकानंद महाविद्यालय) उपस्थित होते. तसेच शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सचे मार्गदर्शक मा. सारंग टाकळकर (सचिव, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था), इतिहास विभागप्रमुख डॉ. सुषमा देशपांडे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक प्रा. माधुरी भावसार, प्रा. डॉ. प्रभाकर गायकवाड व प्रा. कविश्री देशमुख आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.प्रमुख वक्ते डॉ. कैलास भरकड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेत उत्कृष्ट राजा व कुशल प्रशासक कसा असावा याचे आदर्श उदाहरण महाराजांनी घालून दिले असून त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले.‘ट्रॅव्हल अँड टुरिझम’ शॉर्ट टर्म सर्टिफिकेट कोर्सचे मार्गदर्शक मा. सारंग टाकळकर यांनी पर्यटन क्षेत्रातील विविध करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले. पर्यटक व्यवस्थापक, पर्यटन मार्गदर्शक (गाईड), हॉटेल व होम स्टे व्यवस्थापन, अ‍ॅग्रो टुरिझम, दुभाषी सेवा, विमानतळ सेवा तसेच प्रशासकीय क्षेत्रात विद्यार्थिनींसाठी उपलब्ध असलेल्या संधींची माहिती त्यांनी दिली.शिवजयंतीनिमित्त विद्यार्थिनींनी शिवचरित्रावर आधारित विविध प्रसंगांचे प्रभावी सादरीकरण केले. पोवाडा, नृत्य, लाठी-काठीचे साहसी प्रकार, गायन, स्वगत व नाट्यप्रयोग यांद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्याचे उत्कृष्ट दर्शन घडविण्यात आले.स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली. प्रथम क्रमांक कु. अंजली खिराडे, द्वितीय क्रमांक समूह नृत्य (कु. सांची रोकडे, पूजा गायकवाड, कांचन कांबळे), तृतीय क्रमांक कु. वैशाली जाधव, तर उत्तेजनार्थ पारितोषिक कु. भार्गवी मोदी हिला प्रदान करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात शिवप्रतिमा पूजनाने झाली. प्रास्ताविकात इतिहास विभागप्रमुख डॉ. सुषमा देशपांडे यांनी विभागातर्फे दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. शिवजयंतीनिमित्त आयोजित स्पर्धांमधून विद्यार्थिनींपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, त्यांचा पराक्रम व स्वराज्य स्थापनेतील योगदान पोहोचावे आणि त्यातून विद्यार्थिनींना प्रेरणा मिळावी, हा कार्यक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी इतिहास विभागाचे अभिनंदन करून छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र विद्यार्थिनींसाठी सदैव प्रेरणादायी असल्याचे नमूद केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास साधला जातो, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. भार्गवी मोदी हिने केले, तर आभार प्रदर्शन प्रा. कविश्री देशमुख यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे परीक्षण डॉ. अन्विता अग्रवाल यांनी केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६


## जय विज्ञान

विज्ञानाने दाखविली
नवी समृद्धीची वाट
घराघरात दिसतो
त्याचा किती थाट

स्वयंपाक खोलीत सदा
मिक्सरचेच राज्य
हवा तो पदार्थ
बारीक करण्यास सज्ज

इंटरनेट देतो आपणास
माहिती व ज्ञान
दडलीय त्यात
अफाट ज्ञानाची खाण

घड्याळातील काटे
रात्रंदिवस फिरतात
वेळेची महती
सर्वांना पटवून देतात

फ्रिजमधील पाणी पितांना
वाटे खूप मजा
माठाला मिळाली
कायमची रजा

नको आता अंधश्रद्धा
नको आता अज्ञान
नव्या युगाचा नारा
जय विज्ञान




**- रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि. यवतमाळ
मो.९०११५५९१०६



प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103


# देवगिरीत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या कवितांचे वाचन



**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा गौरवदिनानिमित्त मराठी साहित्यातील कविश्रेष्ठ कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर यांच्या गाजलेल्या कवितांचे वाचन अकरावी व बारावी वर्गातील विद्यार्थ्यांनी केले. यामध्ये सार्थकी महाजन- पृथ्वीचे प्रेमगीत,सुमित गाडे- क्रांतीचा जयजयकार, शिवराज फलके -कोलंबसचे गर्वगीत आणि भागवत किरळकर -मराठी माती या नावाजलेल्या कवितांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी अत्यंत जोशपूर्ण वातावरणात करून खऱ्या अर्थाने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा केला.याप्रसंगी या कार्यक्रमाला देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य अरुण काटे, रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. किसन सुपेकर,पर्यवेक्षक डॉ.राजन राजपूत डॉ.जिजा शिंदे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा.अरुण काटे यांनी मराठी भाषा गौरव दिन हा केवळ एक उत्सव नसून आपल्या अस्मितेचा, संस्कृतीचा आणि अभिमानाचा सोहळा आहे.वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांच्या तेजस्वी प्रतिभेने मराठी साहित्याला जागतिक पातळीवर मानाचे स्थान मिळवून दिले आहे. म्हणूनच आजचा दिवस औपचारिकतेपुरता मर्यादित न ठेवता भाषेच्या जतन, संवर्धनाची व समृद्ध वापराची प्रतिज्ञा करून साजरा करणे गरजेचे आहे.मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही तर ती भावना, संस्कार, परंपरा, विचाराची ओळख आहे. त्यामुळे मराठीचा अभिमान बाळगूया तिचा समृद्ध वारसा पुढील पिढ्यापर्यंत पोहोचवूया असे प्रतिपादन केले.याप्रसंगी कार्यक्रमाला प्रा.साईनाथ लंभाडे, प्रा.राजश्री सोनवणे, प्रा.सुनीता गवळी प्रा.मोनाली पालोदकर, प्रा.शिवांगी खंदारे प्रा.अश्विनी कुंभार यांची उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जिजा शिंदे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक डॉ.राजन राजपूत यांनी मानले या कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# साहित्यातून सामाजिक व मानवी मुल्यांची पेरणी व्हायला हवी - प्रा. डॉ. सतीश मस्के




**पिंपळनेर :** कुसुमाग्रज हे क्रांतिकारी व मानवतेचे कवी होते. त्यांनी आपल्या साहित्यातून समाज परिवर्तनाचे व मानवी मूल्यांचे जतन केले.मराठी भाषा त्यांनी कथा, कविता, नाटक इ. माध्यमातून सगळीकडे पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळेच त्यांना साहित्यातील सर्वोच्च अशा ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.असे मत मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्ताने व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. बी. पवार हे होते. विचारमंचावर प्रा. एल. जे. गवळी, प्रा. डी. बी. जाधव, प्रा.टी.एस. तोरवणे, प्रा.एस.पी.खोडके अधिक मान्यवर उपस्थित होते.कर्म.आ.मा. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.पुढे बोलताना डॉ. सतीश मस्के म्हणाले की, कुसुमाग्रजांच्या साहित्याने माणसांची मने संवेदनशील बनवली. स्वतंत्रोत्तर चळवळीत व काळाराम मंदिर सत्याग्रह आंदोलनातही त्यांनी उडी घेतली होती. त्यामुळेच त्यांच्या साहित्याला एक मौलिक दर्जा प्राप्त झाला. त्यामुळेही सामाजिक मूल्याची पेरणी त्यांनी आपल्या साहित्यातून केली. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पवार म्हणाले की, प्रत्येक राज्यांच्या भाषा या वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. आपल्या महाराष्ट्राची भाषा ही मराठी आहे. याच मराठी भाषेतून कुसुमाग्रजांनी कथा व कवितांच्या व इतर साहित्याच्या माध्यमातून मानवी जीवन मांडले. भाषा व्यक्त होण्याचे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे भाषेचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांनीही आपले व्यक्तिमत्व सुधारणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयक्यूएसी चे प्रमुख प्रा. डॉ.एस. पी.खोडके यांनी केले. आभार मराठी विभागाचे प्रा.एल.जी. गवळी यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुनील पवार व कैलास जिरे यांनी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६

## जिंतूर तालुक्यातील १७ इंग्रजी शाळांत १०८ विद्यार्थ्यांना आरटीईतून प्रवेश




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा मार्ग खुला करत १७ इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये एकूण १०८ जागांवर प्रवेश देण्यात येणार आहे. शिक्षण हक्क कायदा अर्थात आरटीई अंतर्गत ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून पालकांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.आरटीई अंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात. त्यानुसार जिंतूर तालुक्यातील १७ इंग्रजी शाळांमध्ये एकूण १०८ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची संधी उपलब्ध होणार आहे. ऑनलाइन अर्ज करण्याचा कालावधी १७ फेब्रुवारी २०२६ ते १० मार्च २०२६ असा निश्चित करण्यात आला आहे. निर्धारित मुदतीनंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. अर्ज करताना विद्यार्थ्याचा जन्म दाखला, रहिवासी दाखला, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र (लागू असल्यास), आधारकार्ड व पासपोर्ट आकाराचा फोटो आदी कागदपत्रे आवश्यक राहतील. तसेच शासनाने निश्चित केलेल्या आर्थिक उत्पन्न मर्यादेत येणाऱ्या व पात्र वयोगटातील विद्यार्थ्यांनाच प्रवेशासाठी पात्रता राहणार आहे.ऑनलाइन अर्ज भरताना माहिती अचूक व पूर्ण भरावी, अन्यथा अर्ज बाद होऊ शकतो. पात्र अर्जदारांची निवड सोडत पद्धतीने करण्यात येणार असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी संकेतस्थळावर जाहीर केली जाणार आहे. अधिक माहितीसाठी संबंधित शाळा अथवा गटशिक्षणाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## "स्त्रियांमुळेच भाषा साहित्य संस्कृती अभिजात ठरली"- डॉ. शारदा बुधवंत




**छत्रपती संभाजीनगर :** "मायबोली,मातृभाषा हे शब्द, बाळाचा पहिला उच्चार म म म अ असा येतो , यासह भाषेचे आचार विचाराचे संस्कार मुलांवर स्त्रीच करते,संस्कृतीचे जतन वहनही तीच करते म्हणूनच स्त्रियांमुळेच भाषा,साहित्य, संस्कृती अभिजात ठरली आहे-"असे प्रतिपादन प्रा डॉ.शारदा बुधवंत यांनी मराठी भाषा गौरव दिनाच्या विशेष कार्यक्रमात केले." डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभाग आयोजित कवी कुसुमाग्रज जयंती निमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते.प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा.एन.एम.करडे यांनी केले,डॉ. शारदा बुधवंत यांनी लोकसाहित्य, ओवी , संत ज्ञानेश्वर यांची ओवी,महानुभाव साहित्य, वारकरी संप्रदाय, नामदेव तुकारामांचे कार्य ते इरावती कर्वे,शांता शेळके, फडके,खांडेकर, महात्मा फुले-शाहू-आंबेडकर,नामदेव ढसाळ , बाबुराव बागुल ते कुसुमाग्रज करंदीकर नेमाडे अशा अनेक लेखक कवी संत सुधारकांनी मराठीची जडणघडण केल्याचे स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. आर. व्ही. मस्के यांनी बोलीभाषेचे महत्व स्पष्ट करत बोली व ग्रामीण भाषेमुळे साहित्य,भाषा व संस्कृती समृद्ध झाल्याचे सांगितले.शेवटी आभार कार्यालयीन अधिक्षक राजू पट्टेकर यांनी आभार व्यक्त केले . कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन प्रा.नवनाथ गोरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामभाऊ धबदुले व शेख शब्बीर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारीवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

## भोगाव (देवी) येथे युवकाची आत्महत्या



**जिंतूर जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** तालुक्यातील भोगाव देवी येथील - (शेख मुक्तार पी.एस. शेख दौत, वय १९, रा. भोगाव ता. जिंतूर) दिनांक २४ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजताच्या सुमारास घरामध्ये विषारी औषध घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.दर रोज घर खर्चासाठी लागणारे पैसे कुठुन आणयचे या करणामुळे उंदीर मारण्याचे पुडीतील विषारी औषध घेवुन आत्महत्या केल्यामुळे सदरील युवकास ग्रामीण रुग्णालयात दाखल केले व पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले होते. परभणी येथे उपचार दरम्यान मृत्य झाला. सदरील मृत्यू प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून सदरील तपास जमादार यशवंत वाघमारे करत आहे.

## किनगाव राजा येथे तलाठी कार्यालयाच्या बांधकामात मोठा घोटाळा?



**बुलढाणा (महेश मुंढे) :** येथे ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) कार्यालयासाठी सुरू असलेल्या नवीन इमारतीच्या बांधकामाबाबत गंभीर तक्रारी समोर येत आहेत, इमारतीच्या बांधकामा संबंधित ठेकेदारामार्फत अत्यंत निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्यात येत असून याकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे गावात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे, स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार इमारतीच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जात आहे, सिमेंट, वाळू ऐवजी डस्ट, आणि निकृष्ट दर्जाच्या विटा यांचे गुणवत्ता अत्यंत हलकी असून बांधकामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्याचे प्रत्यक्ष पाहणीतून दिसून येत आहे, बांधकामावर पाण्याचा वापर देखील अत्यंत कमी असून भविष्यात ही इमारत सुरक्षित राहील का? असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे हे कार्यालय जनतेच्या कररूपी पैशातून होत असल्याने पैशांचा अपव्य होत असल्याची भावना नागरिकांमध्ये तीव्र होत आहे. संबंधित बांधकाम विभागाने आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी पाहणी करून कामाचे गुणवत्ता तपासणी अपेक्षित असताना कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप केला जात आहे, ग्रामस्थांकडून प्रशासनाला तातडीने लक्ष घालून कामाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात आहे, दोषी ठेकेदारावर कठोर कारवाई करून दर्जेदार बांधकाम सुनिश्चित करावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे, आता जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभाग या प्रकरणाची दखल घेऊन योग्य ती कारवाई करेल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६


## जीवन समृद्ध ज्ञानसंपन्न करण्यासाठी ग्रंथाशी मैत्री महत्त्वाची - शेषराव खटाणे



**जिंतुर जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** यशस्वी आणि दुरदृष्टी ठेवून वाटचाल करण्यासाठी वाचन संस्कार महत्त्वाचा. आपण शालेय जीवनापासून ग्रंथ मैत्री जपली पाहिजे कारणं ग्रंथ हे माणसाला सुसंस्कृत आणि संस्कारक्षम बनवतात. ग्रंथ ज्ञान संपन्न करतात आणि व्यक्तिमत्त्व विकास घडवण्यासाठी अत्यंत मोलाचे योगदान देतात . वक्तृत्व आणि वाचन संस्कार यांच्या अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे स्वभाव धिटपणा निर्माण करतात. त्यामुळे समाजात वेगळी प्रतिमा आणि प्रतिभा उमटविण्याचं काम ग्रंथ करतात.विद्यार्थी दशेत वाचन संस्कार अंगिकारला पाहिजे तरच तुम्ही जीवनात यशस्वी होऊ शकता. असं जय भवानी सार्वजनिक वाचनालय गुळखंड ता.पालम येथील एका कार्यक्रमाप्रसंगी उद्धाटनप्रसंगी शेषराव खटाणे सहाय्यक पोलिस निरीक्षक पालम हे बोलतं होते. पुस्तक माणसाचं मस्तक सशक्त करतात प्रामाणिक माणूस घडवण्यासाठी ग्रंथ वाचन मोलाचे असते. वाचकांना आवडलेले पुस्तक देण्यासाठी आम्ही प्रामाणिक सेवा देत असतोत . वाचकांनी देखील तेवढीच तत्परता दाखवली पाहिजे. वेळेचं नियोजन करून वाचन संस्कार जपण्यासाठी वेळ दिला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराज हे कष्टप्रद प्रवास करत जनतेच्या हितासाठी अहोरात्र विचार करत मोठे झाले. आज आपल्या सहज आधुनिक तंत्रज्ञान विकसित झाले आहे त्याचा सदुपयोग करून ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या जाव्यात असं अध्यक्षीय समारोप प्रसंगी जीवनराव लोखंडे बोलत होते. जय भवानी सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने दरवर्षी शिवजयंती निमित्त देण्यात येणारा उत्कृष्ट ग्रंथपाल पुरस्कार प्रदान करण्यात येतो. सन २०२४-२०२५ पुरस्कार सेलू ता.सेलू येथील स्वामी रामानंद तीर्थ हिंदी मराठी ग्रंथालयाचे ग्रंथपाल महादेव माणिकराव आगजाळ यांना तर सन : २०२५ -२०२६ चा बोरी ता.जितुर येथील जयकुमार जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जयकुमार जैन यांना देण्यात आला. पुरस्कारांचे स्वरूप सन्मानपत्र, सन्मान चिन्ह,शाल श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष जीवनराव लोखंडे उदघाटक शेषराव खटाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक पालम सत्कार मुर्ती महादेव आगजाळ नेमिनाथ जैन पोलिस कॉन्स्टेबल सुदाम धुळगंडे, कोलमवार कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाचनालयाचे अध्यक्ष बापुसाहेब पौळ, प्रास्ताविक कु.दुर्गा पौळ तर आभार ग्रंथपाल अर्जुन पौळ यांनी मानले. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर बालवाचक कु.सई , आराध्या, गीता,भक्ती, प्रतिक्षा, संध्या पौळ,प्रशिक जोंधळे. उत्कृष्ट रोज वाचक व उत्कृष्ट ग्रंथ वाचक पुरस्कार पुढील प्रमाणे प्रदान करण्यात आले .वंश दिपक कांबळे, प्रशिक विकास जोंधळे, शिवशंकर यशवंत कटकमक्रे, सम्यक गौतम जोंधळे, क्रिश लक्ष्मण सरोदे कुं. अस्मिता श्रीहरी बिडकर ,स्नेहा संग्राम पोळ, मनीषा रमेशराव पोळ इत्यादी. कार्यक्रमाला प्रतिष्ठित नागरिक किशनराव पौळ, सरपंच दत्तात्रय पौळ, व वाचक महिला वाचक,बालवाचक यांची उपस्थिती होती.

## उच्च शिक्षणातील जातीभेदाविरुद्ध छत्रपती संभाजीनगरात एल्गार

**छत्रपती संभाजीनगर :** देशभरातील विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसी विद्यार्थ्यांवर होणाऱ्या उघड व छुप्या भेदभावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने लागू केलेल्या 'यूजीसी अधिनियम 2026' संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती उठविण्याच्या मागणीसह त्याला अधिक सक्षम करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्रात चळवळ उभी राहत आहे.राजकुमार बडोले फाउंडेशन आणि लॉर्ड बुद्धा टीव्ही यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील १५ जिल्ह्यांत 'लाईव्ह महाचर्चा' मालिकेचे आयोजन करण्यात आले असून, त्याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे विशेष चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाचा तपशील :दिनांक: शनिवार, 28 फेब्रुवारीवेळ: सायं. 6.30 वाजतास्थळ: डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेटसमोर, छत्रपती संभाजीनगरयात प्रमुख वक्तेआयु. सचिन निकम (विद्यार्थी नेते)प्रा. ऋषिकेश कांबळे (ज्येष्ठ साहित्यिक)डॉ. शंकर अंभोरे (शिक्षक संघटना प्रतिनिधी)डॉ. संदीप घुगरे (ओबीसी विचारवंत)डॉ. हर्षवर्धन दवणे (राष्ट्रीय विद्यार्थी नेते)भीमराव हत्तीअंबीरे (संस्थापक, संबोधी प्रशिक्षण संस्था)अनंत भवरे (संविधान विश्लेषक)दीक्षा पवार (काँग्रेस पदाधिकारी)प्रशांत बोराडे (विद्यार्थी नेते) आदिंची उपस्थिती असणार आहे.चर्चेचा गाभाउच्च शिक्षण संस्थांमध्ये समान संधी, भेदभावमुक्त वातावरण आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करणे हा 'यूजीसी अधिनियम 2026'चा मूलभूत उद्देश असल्याचे आयोजकांचे मत आहे. मात्र, अधिनियम लागू झाल्यानंतर अल्पावधीतच सर्वोच्च न्यायालयाने दिलेली स्थगिती ही बहुजन विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारांवर आघात असल्याची भूमिका आयोजकांनी व्यक्त केली आहे तसेच सदरील अधिनियमातील अनेक त्रुटी देखील असल्याने त्याचा समावेश व्हावा असा देखील मतप्रवाह असल्यानेया पार्श्वभूमीवर आयोजित महाचर्चांमध्ये — उच्च शिक्षणातील जातीय भेदभावाचे वास्तव, कायद्याची घटनात्मक व तांत्रिक बाजू, सामाजिक न्यायाची पुढील दिशा,या मुद्द्यांवर सखोल विचारमंथन केले जाणार आहे.राज्यव्यापी उपक्रम२० फेब्रुवारी ते १५ मार्च या कालावधीत राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये ही चर्चा मालिका राबविण्यात येत आहे. आंबेडकरी विचारवंत, कायदेतज्ज्ञ, बहुजन विद्यार्थी संघटनांचे प्रतिनिधी आणि प्राध्यापक प्रत्यक्ष अनुभवांच्या आधारे विषय मांडत आहेत."हा कायदा बहुजन विद्यार्थ्यांसाठी महत्वपूर्ण असून त्यात आवश्यक बदलासह त्याची अंमलबजावणी थांबविणे अन्यायकारक आहे. संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी ही महाचर्चा निर्णायक पाऊल ठरेल,"

असा विश्वास आयोजक सचिन मून, विजय खंडागळे, गजेंद्र गवई, प्रशांत शहारे आणि राकेश भास्कर यांनी व्यक्त केला आहे.राज्यातील युवक, विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या वैचारिक उपक्रमाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## "चांगली पुस्तके आणि सज्जन माणसे लवकर भेटत नाही" - कवी अय्युब पठाण लोहगावकर



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** मराठी राजभाषा दिनानिमित्ताने छत्रपती संभाजीनगर जवळ असलेल्या साजापूरच्या जिल्हा परीषदेत शाळेत आयोजित कार्यक्रमात कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांनी मराठी भाषेवर मार्गदर्शन करतांना सांगितले की, "आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी हे मोबाईलच्या मायाजाळात सापडलेले असून त्यांच्याकडून अवांतर पुस्तक वाचनाकडे दुर्लक्ष होत असून त्यामुळे वाचनाचे महत्व दिवसोंदिवस कमी होत आहे. आज काल चांगली पुस्तके आणि सज्जन माणसे लवकर भेटत नाही, ती जर का आपणाला मिळाली तर नक्कीच वाचकांच्या वर्तनातील परिवर्तन झाल्याशिवाय राहत नाही." प्रारंभी अय्युब पठाण यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून आपल्या मधूर आवाजात " माझी मायमराठी " ही कविता सादर केली. यावेळी मुख्याध्यापक,आणि शिक्षक भास्कर गोपाल,अनिल जाधव यांच्यासह इतर शिक्षक-शिक्षिका तसेच विद्यार्थी या कार्याक्रमाला मोठया संख्येने हजर होते.

## मराठी भाषा दिन : अभिव्यक्तीचा उत्सव

**बीड (भगवंत पाळवदे) :** आपली भाषा ही अभिजात मराठी म्हणून मान्य झाली आहे. अमृतातेही पैजा जिंकणारी आपली ही मातृभाषा आणि ही भाषा बोलण्याचा सार्थ अभिमान आपण बाळगत आहोत कोणत्याही भाषेत असणारे शब्द स्वीकारण्याची आणि त्यानुरूप उत्क्रांत होण्याची क्षमता असल्यामुळे आपली मराठी समृद्ध आणि संपन्न होत आहे, याचाही सार्थ अभिमान आपणास हवा.दरवर्षी 27 फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रात "मराठी भाषा दिन" म्हणून साजरा केला जातो. ज्येष्ठ कवी वसंत बापट यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची, इतिहासाची आणि अस्मितेची वाहक असते. 27 फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा जन्मदिन. त्यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.मराठी भाषेचा समृद्ध वारसामराठी ही इंडो-आर्यन भाषासमूहातील एक प्रमुख भाषा असून तिचा इतिहास सुमारे एक हजार वर्षांहून अधिक जुना आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या अभंग-ओव्यांनी मराठीला अध्यात्मिक उंची दिली. पुढे शाहिरी परंपरा, पोवाडे, भारुडे, कीर्तन या माध्यमांतून मराठी जनमानसात रुजली.छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठी प्रशासनाची भाषा बनली. राजकारभारात, किल्ल्यांवरील पत्रव्यवहारात आणि शासननिर्णयांत मराठीचा प्रभावी वापर होत असे. त्यामुळे मराठीला स्वाभिमानाचे आणि स्वराज्याचे प्रतीक मानले जाते.साहित्य, पत्रकारिता आणि आधुनिक मराठीलोकमान्य टिळकांनी 'केसरी'सारख्या वृत्तपत्रातून मराठी पत्रकारितेला बळ दिले. पुढे प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज अशा अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्य समृद्ध केले. कादंबरी, कथा, कविता, नाटक, चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ आणि आता डिजिटल माध्यमांमुळे मराठीची अभिव्यक्ती अधिक व्यापक झाली आहे.आज मराठी भाषा विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, शिक्षण आणि सामाजिक माध्यमांमध्येही प्रभावीपणे वापरली जात आहे. मराठी विकिपीडिया, ब्लॉग्स, यूट्यूब, पॉडकास्ट या माध्यमांतून नव्या पिढीला मराठीची ओढ निर्माण होत आहे.भाषा जपणे — काळाची गरजजागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असला तरी मातृभाषेचे महत्त्व कमी होत नाही. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विचारांची मांडणी स्पष्ट होते, सर्जनशीलता वाढते आणि संस्कार दृढ होतात.मराठी भाषा दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, दैनंदिन जीवनात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याची शपथ घेण्याचा दिवस असावा. घरात, कार्यालयात, शाळेत आणि सार्वजनिक व्यवहारात मराठीचा सन्मानपूर्वक वापर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.मराठी ही

केवळ भाषा नाही, तर ती आपली ओळख आहे, संस्कृती आहे, आत्म्याचा आवाज आहे. "जय जय महाराष्ट्र माझा" म्हणताना ज्या अभिमानाची भावना जागते, तीच भावना मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ व्हावी.चला, मराठी भाषा दिनी आपण सर्वांनी मराठीचा गौरव करूया, तिचे संवर्धन करूया आणि पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य ठेवा जपूया.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६

# मराठी - माझी माय, माझा अभिमान

27 फेब्रुवारी... हा दिवस माझ्यासाठी फक्त एक तारीख नाही. हा दिवस म्हणजे माझ्या आईसारख्या असलेल्या मराठी भाषेला मनापासून वंदन करण्याचा दिवस आहे. आपण हा दिवस महान कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा दिन म्हणून साजरा करतो. त्यांच्या लेखणीतून मराठीला एक वेगळीच ताकद, आत्मविश्वास आणि अभिमान मिळाला.मराठीबद्दल त्यांनी व्यक्त केलेली भावना आजही आपल्याला प्रेरणा देते."माझ्या मराठी मातीचा, लावा कपाळी टिळा,हिच्या संगतीनेच वाढला, माझ्या जीवनाचा झरा."माझ्यासाठी मराठी ही फक्त संवादाची भाषा नाही, तर माझी ओळख आहे. मी पहिल्यांदा "आई" म्हटलं, ते मराठीतच. माझं पहिलं गाणं, पहिली कविता, पहिला निबंध सगळं मराठीतच. त्यामुळे मराठी माझ्या मनाच्या खूप जवळ आहे. जेव्हा मी आनंदात असते, तेव्हा मनातले शब्द मराठीतच उमटतात. आणि जेव्हा दुःखी असते, तेव्हाही मन मोकळं करायला मराठीच मदतीला धावून येते.आपली मराठी भाषा किती समृद्ध आहे, हे तिच्या परंपरेतून दिसून येतं. संतांच्या अभंगातून तिने समाजाला दिशा दिली. संत ज्ञानेश्वर यांनी ज्ञानेश्वरीतून अध्यात्म सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवलं, संत तुकाराम यांनी आपल्या अभंगातून जीवनमूल्ये शिकवली. पुढे अनेक कवी, लेखक, नाटककारांनी मराठी साहित्य अधिक समृद्ध केलं.मराठीच्या अभिमानाबद्दल कुसुमाग्रजांच्या ओळी आठवतात. "जग बदलायचे असेल तर, आधी मन बदलावे लागते,आणि मन बदलण्यासाठी, शब्दांना सामर्थ्य द्यावे लागते."मराठी भाषेची खासियत म्हणजे तिची गोडी आणि साधेपणा. आपण मनातलं काहीही अगदी सहज मराठीत व्यक्त करू शकतो. आनंद, राग, प्रेम, आपुलकी सगळं काही मराठीत अधिक नैसर्गिक वाटतं. कारण ही भाषा आपल्या संस्कारांची, आपल्या मातीची आहे.आजच्या काळात इंग्रजी आणि इतर भाषा शिकणं गरजेचं आहे, त्यातून प्रगतीच्या नवीन वाटा उघडतात. पण त्याच वेळी मराठी बोलताना कमीपणा वाटून घेणं योग्य नाही. मराठीत बोलणं म्हणजे मागे पडणं नाही, तर आपल्या मुळांचा अभिमान बाळगणं आहे. भाषा टिकते ती वापराने. आपणच जर मराठीचा वापर कमी केला, तर ती कशी वाढेल?याच भावनेतून आणखी एक प्रेरणादायी विचार "भाषा ही केवळ ओळख नाही, ती आत्म्याची शक्ती आहे,जिच्या आधारावर उभी राहते, संस्कृतीची प्रत्येक ज्योती आहे."आज आपण मोबाईल, सोशल मीडियावर सतत काही ना काही लिहित असतो. जर आपण तिथेही जाणीवपूर्वक मराठी वापरली, मराठी पुस्तकं वाचली, मराठी लेखन केलं, तर भाषेचं सौंदर्य अधिक फुलेल. लहान भावंडांना मराठी कथा सांगूया, त्यांना मराठी कविता ऐकवूया. कारण भाषा जिवंत राहते ती पुढच्या पिढीकडे पोहोचली की.खरं सांगायचं तर, कधी कधी मी डायरी लिहिते तेव्हा जाणवतं मराठी शब्दांमध्ये एक वेगळीच ऊब आहे. जसं आई कुशीत घेतल्यावर सुरक्षित वाटतं, तसं मराठीत मन मोकळं केल्यावर हलकं वाटतं. हे नातं शब्दांपलीकडचं आहे.आणि अजून एक गोष्ट मला नेहमी जाणवते, ती म्हणजे मराठी भाषेची आपुलकी. गावाकडच्या बोली असोत, शहरातील शुद्ध मराठी असो किंवा मित्रमैत्रिणींमध्ये बोलली जाणारी साधी मराठी प्रत्येक ठिकाणी तिचा वेगळा गोडवा आहे. आपल्या बोलीभाषांमुळे मराठी अधिक रंगतदार आणि जिवंत वाटते. हाच विविधतेतील एकपणा आपल्या भाषेला खास बनवतो.मराठी ही केवळ साहित्यापुरती मर्यादित नाही. ती आपल्या सणांमध्ये, परंपरांमध्ये, गाण्यांमध्ये, नाटकांमध्ये आणि दैनंदिन व्यवहारातही जिवंत आहे. शाळेत शिकलेली कविता असो, एखाद्या कार्यक्रमातील भाषण असो किंवा घरातले साधे संभाषण प्रत्येक ठिकाणी मराठी आपल्याला जोडून ठेवते. म्हणूनच ही भाषा फक्त शिकायची गोष्ट नाही, तर जगायची गोष्ट आहे.आजच्या वेगवान युगात आपण अनेक गोष्टी पटकन स्वीकारतो, पण आपल्या मुळांचा विसर पडू नये याची काळजी घ्यायला हवी. मराठी वाचणं, चांगली पुस्तकं हातात घेणं, विचार करायला लावणारे लेख वाचणं या सगळ्यामुळे आपली भाषा अधिक समृद्ध होते आणि आपला विचारही व्यापक होतो. भाषा जितकी मजबूत, तितका समाज अधिक सशक्त.यासोबतच मला असंही वाटतं की मराठी ही फक्त भूतकाळाची भाषा नाही, तर भविष्याचीही भाषा आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, कला प्रत्येक क्षेत्रात मराठीने आपला ठसा उमटवावा. आपण जर आत्मविश्वासाने मराठीत विचार मांडले, तर ही भाषा नक्कीच जगभर पोहोचेल.आपण अनेकदा म्हणतो की "काळ बदलला आहे", पण काळ बदलला म्हणून मुळं सोडायची नसतात. उलट बदलत्या काळात आपल्या भाषेला नवी दिशा देणं हीच खरी प्रगती आहे. मराठीमध्ये नवीन साहित्य निर्माण होऊ दे, नवीन विचार मांडले जाऊ देत, आणि नवीन पिढीला अभिमानाने म्हणता यावं "हो, हीच माझी भाषा!"म्हणून मला असं वाटतं की मराठी भाषा दिन हा फक्त उत्सव नाही, तर एक आठवण आहे. आपल्या मातीशी जोडून राहण्याची, आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगण्याची आणि पुढच्या पिढीसाठी ही परंपरा जपण्याची. आपण प्रत्येकाने मनापासून प्रयत्न केला, तर मराठीचा आवाज अधिक बुलंद होईल. शेवटी "माझी भाषा, माझा श्वास, माझ्या अस्तित्वाचा आधारमराठीच्या या प्रेमासाठी, आयुष्यभर राहीन ऋणी फार"मराठी ही फक्त शब्दांची माळ नाही, ती भावनांची ओंजळ आहे.ती आपल्या हृदयात आहे, आपल्या विचारात आहे आणि आपल्या अस्तित्वात कायम राहणार आहे.जय महाराष्ट्र!

**रजनी कैलास गारघाटे**
**मो.नं :-9356304743**

# भाषा ही नदीसारखी प्रवाही असते - माजी प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे




**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड व प्रमुख उपस्थितीत मराठी विभागप्रमुख डॉ. आशिया चिश्ती या होत्या. प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे पुढे म्हणाले की,मराठी भाषा आणि संस्कृती वाढविण्यासाठी प्रमाण भाषा किंवा व्याकरणाची गरज नसून आईची भाषा हीच सर्वश्रेष्ठ भाषा असते.कोणतेही मुल ही आईची भाषाच बोलत असते.महाराष्ट्रात अनेक भाषेची विद्यापीठे आहेत,पण मराठी भाषेचे विद्यापीठ नव्हते पण अमरावतीला मराठी भाषेचे विद्यापीठ स्थापन झाले हे मराठी भाषेच्या दृष्टीने आनंदाची व समाधानाची बाब आहे.इंग्रजी शाळेचे वाढते आकर्षण ही चिंतेची बाब असून त्यामागील कारणमीमांसा लक्षात घेणे गरजेचे आहे.इंग्रजी ही ज्ञानभाषा आहे यात कांहीच वाद नाही.इंग्रजी भाषेचे अभ्यासक,संशोधक,लेखक,विचारवंत चतुरस्त्र आहेत.त्यामुळे त्यांनी जगातील सर्व भाषेची माहिती इंग्रजी भाषेत आणली,त्यासाठी वाट्टेल ते श्रम करण्याची जबाबदारी त्यांची असते.मराठी भाषेला प्रवाही आणि जिवंत ठेवण्यासाठी तिला ज्ञानभाषा बनवणे गरजेचे आहे. भाषा मुळात प्रवाही नदीसारखी असते .त्या प्रवाहात अनेक शब्द अनेक अर्थ सामावून घेण्याची तिची क्षमता असते. ती क्षमता सतत वृद्धिंगत करणे हे मराठी भाषिक म्हणून आपली जबाबदारी आहे. तर आणि तरच मराठी भाषा येत्या काळात जिवंत राहू शकते शासनाची उदासीनता व मराठी भाषकांच्या देश जबाबदार पडा येत्या काळात मराठी भाषेच्या अस्तित्वाला धोका निर्माण करू शकतो त्यामुळे सजगपणे वाटचाल करणे हे गरजेचे आहे.त्यासाठी चांगले साहित्यिक, प्रवर्तक नेतृत्व निर्माण होणे हेही गरजेचे आहे.,असेही त्यांनी प्रतिपादन केले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला सर्व उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार व पुष्प अर्पण करून वंदन करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ.मेघा जोशी यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून,मराठी भाषेचा प्रवास कसा झाला याविषयी ऊहापोह करून मराठी भाषा गौरव दीन आयोजित करण्यामागील भूमिका स्पष्ट केली.यावेळी अनेक विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांचा परिचय प्रा.डॉ.विनोद धनेराव यांनी करून दिला.प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी आपल्या सविस्तर व्याख्यानात मराठी भाषेतील गंमती गमती सांगत मराठी भाषेच्या स्थित्यंतराचे विविध टप्पे आणि प्रक्रिया समजाऊन सांगितले. यानिमित्ताने मराठी भाषेची उत्क्रांती विषद केली .मराठी भाषेचे संवर्धन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी असून प्रत्येकांनी आपल्या मातृभाषेविषयी कृतज्ञता व्यक्त करून मराठी भाषेचे संरक्षण केले पाहिजे .सध्या मराठीविषयी शासनाकडे कुठलाही कार्यक्रम नसून याउलट मराठी शाळा बंद पडत आहेत ही दुर्दैवाची बाब आहे,असे सांगून कमी वेळात आशयपूर्ण आणि सहजसुलभ व्याख्यान दिले.या मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.उमाकांत सूर्यवंशी यांनी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.मेघा जोशी यांनी केले.तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ.विनोद धनेराव यांनी करून दिला.कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी आपल्या छोटेखानी अध्यक्षीय समारोपात मराठी भाषेच्या समृद्ध संस्कृतीची चर्चा केली.रीतसर आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ.आसिया चिश्ती यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री साईराज पोतदार, श्री. ऋषिकेश शिंदे, श्री.प्रमोद शाईवाले,श्री.गिरीश हिरवे, श्रीमती कारभारी मॅडम, श्री. सिद्धार्थ पतंगे, श्री. नरसिंग जाधव, श्री. मोती जटीथोर, श्री. वैभव नाईकवाडे, यांनी परिश्रम घेतले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २८ फेब्रुवारी २०२६


## अंबानगरीत स्वकष्टातून साकारले किशोर मराठी साहित्य संमेलन : आठवीच्या विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी उपक्रम



**अंबाजोगाई (भगवंत पाळवदे) :** स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई येथे इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कष्टाच्या कमाईतून “आद्यकवी मुकुंदराज स्वामी कुमार साहित्य संमेलन” मोठ्या उत्साहात आयोजित करत मराठी भाषा गौरव दिन अनोख्या पद्धतीने साजरा केला. आई-वडील व शेजाऱ्यांची छोटी-मोठी कामे करून मिळवलेल्या पैशांचा सदुपयोग करत विद्यार्थ्यांनी स्वावलंबनाचा आदर्श घालून दिला.या उपक्रमास संस्थेचे सचिव माननीय संतोष दादा कुलकर्णी, संस्थेच्या अध्यक्षा व मुख्याध्यापिका श्रीमती स्वरूपाताई डिग्रसकर तसेच मराठी विषयाच्या शिक्षिका सौ. प्रज्ञाताई शेलमूकर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाची आखणी, नियोजन व अंमलबजावणी स्वतः केली.मराठी भाषा दिनाचे औचित्य साधत विविध स्पर्धा, साहित्य संमेलन, काव्यवाचन, कथाकथन, परिसंवाद व बक्षीस वितरण अशी विविध सत्रे आयोजित करण्यात आली. सकाळी ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशांच्या गजरात, भगवे झेंडे हातात घेऊन पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी फुगडी खेळत सहभाग नोंदवला. संपूर्ण वातावरणात उत्साहाचे व सांस्कृतिक अभिमानाचे दर्शन घडले.कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. दगडू लोमटे यांच्या हस्ते झाले. श्रीमती शैलजा बरुरे व श्रीमती शितल बोधले या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. दुपारच्या सत्रात डॉ. सिद्धेश बिराजदार, श्री. सुदर्शन रापतवार, श्रीमती निशाताई चौसाळकर व श्रीमती संध्या शिंदे सोळंके यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.श्री. दगडू लोमटे यांनी विद्यार्थ्यांशी हसत-खेळत संवाद साधला. श्रीमती शितल बोधले यांनी कविता लेखनाची शैली, भाषेची निवड व अभिव्यक्ती याविषयी मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात श्रीमती निशाताई चौसाळकर व श्रीमती संध्या शिंदे सोळंके यांनी कथाकथन, वाचनसंस्कृती व साहित्याचे महत्त्व पटवून दिले. श्री. सुदर्शन रापतवार यांनी मराठी भाषा दिनाचे व मातृभाषेचे महत्त्व स्पष्ट केले, तर डॉ. सिद्धेश बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका श्रीमती स्वरूपाताई डिग्रसकर यांनी केले. सूत्रसंचालन इयत्ता आठवीतील कु. मानसी अकोलकर व चि. अभंग कदम, चि. श्रीराम यादव चि. यश राडकर यांनी प्रभावीपणे पार पाडले.संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, संघटनकौशल्य व मराठी भाषेप्रती असलेली आस्था प्रकर्षाने जाणवली. विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी स्वकष्टातून आयोजित केलेले हे आगळे-वेगळे “आद्यकवी मुकुंदराज स्वामी कुमार साहित्य संमेलन” शाळेच्या

इतिहासात संस्मरणीय ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## रघुनाथपूरवाडी जिल्हा परिषद शाळेचे यश



**रघुनाथपूरवाडी :** नुकत्याच जाहीर झालेल्या एन एम एस स्पर्धा परीक्षेमध्ये इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. यामध्ये १. अश्विनी सुनील जाधव २. अमृता ज्ञानेश्वर गायकवाड ३. भाग्यश्री संतोष आगलावे ४. गौरी बाळासाहेब गायकवाड उत्तीर्ण झाल्या आहेत. मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि शालेय व्यवस्थापन समितीतर्फे भेटवस्तू आणि

पुष्पगुच्छ देऊन गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.याप्रसंगी केंद्रप्रमुख साईनाथ कवार,संजय जाधव सर, जी बी पवार मॅडम, बि आर जाधव सर, सूर्यकांत फड सर, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274 ,8956362639 , 9270446603 , 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

**मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.**

| | | |
|---|---|---|
| **DMLT**<br>कालावधी २ वर्ष<br>पात्रता : १० वी /१२ वी पास | **SANITARY HEALTH INSPECATOR**<br>कालावधी १ वर्ष<br>पात्रता : १०वी /१२ वी पास | **PG RADIOLOGY**<br>कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)<br>पात्रता : Any B.Sc. |
| **C.T.SCAN**<br>कालावधी १ वर्ष<br>पात्रता : १० वी १२ वी पास | **E.C.G.**<br>कालावधी १ वर्ष<br>पात्रता : १० वी १२ वी पास | **PGDMLT**<br>कालावधी दिड वर्ष (३ सेमिस्टर)<br>पात्रता : B.Sc<br>(Microbiology, chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS) |
| **X-RAY**<br>कालावधी १ वर्ष<br>पात्रता : १०वी, १२ वी पास | **रेडिओलॉजी**<br>कालावधी २ वर्ष<br>पात्रता : १२ वी सायन्स पास | **फिजिओथेरपी**<br>कालावधी २ वर्ष<br>पात्रता : १२ वी सायन्स पास |
| **ऑप्थोमेट्री**<br>कालावधी २ वर्ष<br>पात्रता : १२ वी सायन्स पास | **DIALYSIS TECHNICIAN**<br>कालावधी १ वर्ष<br>पात्रता : १० वी / १२ वी पास | **O.T.TECHINICIAN**<br>कालावधी २ वर्ष<br>पात्रता : १० वी १२ वी पास |



ADMISSION OPEN

बीबीका मकबऱ्याच्या मागे,
हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा,
छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903